परिपत्रक नं. : ३८
(जनरल विभाग)

रयत शिक्षण संस्था, सातारा.
दिनांक २६/०९/२०१८

सर्व शाखाप्रमुख,
रयत शिक्षण संस्था,

यांना.....

**विषय-वर्धापनदिन व शताब्दी शुभारंभनिमित्त होणा-या कार्यक्रमास उपस्थित रहाणेबाबत.**

रयत शिक्षण संस्थेचा वर्धापनदिन व शताब्दी शुभारंभ गुरुवार दि.०४ ऑक्टोबर, २०१८ रोजी संस्थेच्या सर्व शाखांच्यावतीने साजरा केला जाणार आहे. वर्धापन दिन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून **मा.नामदार प्रकाश जावडेकर,** मानव संसाधन विकास मंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली हे उपस्थित राहणार आहेत. सदरचा समारंभ संस्थेचे अध्यक्ष, **मा.खासदार शरदरावजी पवार** यांचे अध्यक्षतेखाली आणि मा.प्रा.डॉ.एन.डी.पाटील, सदस्य, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, मा.डॉ.अनिल पाटील, चेअरमन, रयत शिक्षण संस्था, मा.ॲड.भगीरथ शिंदे, व्हाईस चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या प्रमुख उपस्थितीत कर्मवीर समाधी परिसर, सातारा येथे साजरा केला जाणार आहे.

**1. निवास व्यवस्था -**

सदर समारंभासाठी सर्व शाखाप्रमुखांनी त्यांच्या शाखेतील एक सेवक घेऊन (सदर सेवक शाखेचा ध्वज घेऊन मिरवणूकीत सामील होण्यासाठी शारिरीक दृष्टा सक्षम असावा.) दि.३ ऑक्टोंबर २०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सातारा येथे निवासाची सोय केलेल्या ठिकाणी उपस्थित रहावे.

| अ.नं. | शाखाप्रमुखांचे विभाग | शाखा / निवास व्यवस्था ठिकाण |
|---|---|---|
| ०१. | मध्य विभागातील शाखाप्रमुख व सेवक | कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, |
| ०२. | दक्षिण विभागातील शाखाप्रमुख व सेवक (सांगली जिल्हा ) | श्री.छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस शाखा नं.१ धननीची बाग |
| ०३. | दक्षिण विभागातील शाखाप्रमुख व सेवक (कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व बेळगांव जिल्हा ) | आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, |
| ०४. | उत्तर विभागातील शाखाप्रमुख,सेवक व कर्जत कॉलेजमधील पॅरामिल्टीचे विद्यार्थी चित्ररथ रथ घेवून येणारे सेवक | यशवंतराव चव्हाण इन्स्टि. ऑफ सायन्स |
| ०५. | पश्चिम विभागातील शाखाप्रमुख व सेवक | महाराजा सयाजीराव विद्यालय व महात्मा फुले अध्यापक विद्यालय |
| ०६. | रायगड विभागातील शाखाप्रमुख व सेवक | जिजामाता अध्यापिका विद्यालय व श्री.छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस शाखा नं.२ |
| ०७. | प्राचार्य व सेवक | धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय |
| ०८ | सर्व महिला शाखाप्रमुख व महिला सेवक | छत्रपती शिवाजी कॉलेज मुलींचे वसतिगृह |

पान नं. 02 वर ..

2. **ध्वज वाटप व्यवस्था** - दि. ३ ऑक्टोंबर २०१८ रोजी ज्या ठिकाणी विभागातील सेवकांची निवासाची सोय केलेली आहे, त्या ठिकाणी आपल्या शाखेचा नावाचा ध्वज व पाईप देण्यात येईल. ध्वज व पाईप देण्याची व्यवस्था माध्यमिक आस्थापना विभाग, कार्यालय, रयत शिक्षण संस्था यांनी करावी. मुख्य कार्यक्रम संपल्यानंतर मध्य व दक्षिण विभागातील सेवकांनी पाईप **अण्णासाहेब कल्याणी विद्यालय, सातारा** व उत्तर, पश्चिम व रायगड विभागातील सेवकांनी पाईप **महाराजा सयाजीराव विद्यालय, सातारा** या ठिकाणी जमा करावेत. ध्वज आपल्या शाखेत घेवून जाणे.

**सर्व शाखाप्रमुख व ध्वज धरणारे सेवक दि.०४ ऑक्टोबर २०१८ रोजी सकाळी ६.४५ वाजता प्रभात फेरीसाठी सदरचा ध्वज घेवून कर्मवीर समाधी परिसर, सातारा येथे उपस्थित रहावे. तसेच मुख्य समारंभासाठी सकाळी १०.०० वाजता कर्मवीर समाधी परिसर येथे उपस्थित रहावे.**

सदरच्या कार्यक्रमांकरीता प्रवास परवानगीची आवश्यकता नाही. नियमाप्रमाणे प्रवासखर्च संबंधित शाखेतून घ्यावा.

**(प्रिं.डॉ. भाऊसाहेब कराळे)**
**सचिव,**
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

**प्रत माहितीसाठी रवाना .....**

०१. मा.डॉ.अनिल पाटील, चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा
०२. सहसचिव(उ.शि./माध्य.विभाग), रयत शिक्षण संस्था, सातारा
०३. ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा
०४. सर्व विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था

G:Jpk/09 May 2018/All School Cercular/1-3